।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि ३१ मे २०२६ | पाने ४ | मूल्य १ | अंक २२ वा

## पू. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांची आणि त्यांनी घालून दिलेल्या आदर्श राज्यकारभाराची देशाला आणि राज्याला आजही खरी गरज : आम. डॉ. बाबासाहेब देशमुख



सांगोला : आधुनिक आणि तंत्रज्ञान युगात देखील समाज व्यवस्था आणि न्याय प्रक्रिया राबवत असताना पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांची आणि त्यांनी घालून दिलेल्या आदर्श राज्यकारभाराची देशाला आणि राज्याला आजही खरी गरज आहे त्यांचे कार्य आणि विचार समाजाला दिशा देणारे असल्याचे प्रतिपादन आम. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्ताने धनगर समाज सेवा मंडळ सांगोला तालुका यांच्या वतीने काल शनिवार ३० रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे प्रतिमा पूजन व पुष्प अर्पण कार्यक्रम संपन्न झाला. दरम्यान शैक्षणिक क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त पोलिस अधिकारी अनिल गडदे यांचा ही सन्मान करण्यात आला.यावेळी आम. डॉ. बाबासाहेब देशमुख बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्ष आनंदाभाऊ माने, युवक नेते डॉ. अनिकेत देशमुख, डॉ. पियूषदादा साळुंखे पाटील, नगरसेवक काशिलिंग (बाबू) गावडे, नगरसेवक इंजिनीयर रमेश जाधव, नगरसेवक राजू मदने, चैतन्य राऊत, संचालक दगडू गावडे, सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब गावडे, माजी नगराध्यक्षा राणीताई माने, महिला बालकल्याण समिती सभापती छायाताई मेटकरी, नगरसेविका दिव्यांनी दौंडे, सीमा सरगर, डॉ. स्नेहल ढेरे, युवक नेते नवनाथ शिंगाडे यांच्यासह धनगर समाजसेवा मंडळाचे पदाधिकारी, समाज बांधव उपस्थित होते.

पुढे बोलताना आम. बाबासाहेब देशमुख म्हणाले, पुण्यश्लोक ही पदवी तीन व्यक्तींना मिळाली. यामध्ये पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. कारण पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य आणि इतिहास समाजाला प्रेरणा देणारा आहे. त्यांनी काशीविश्वेश्वरापासून ते पंढरपूरपर्यंत येणाऱ्या वारकऱ्यांना यांच्या कार्याची जाणीव होते. पशु पक्षी यांच्यापासून सर्वसामान्य नागरिक वारकऱ्यांची सोय व्हावी असे नियोजन त्यांनी ३०० वर्षापूर्वी केले आहे. कोणावरही अन्याय होणार नाही याची खबरदारी घेऊन आदर्श राज्य कारभार केला असल्याचे सांगत, चौंडी गावामध्ये मोठ्या प्रमाणात निधी देऊन पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा सन्मान केला त्याबद्दल राज्य सरकारचे त्यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. अनिकेत देशमुख यांनी त्यांच्या विचाराची दिशा घेऊन जयंती साजरी करावी. आजच्या महिलांना आदर्श घेता यावा असे कार्य ३०० वर्षा पूर्वी केले. काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत मंदिराचा जीर्ण उध्दार केला, आदर्श कारभार केला असल्याचे सांगत, सर्वांना सामावून घेऊन जयंती साजरी करावी असे ही सांगितले.

या कार्यक्रमा दरम्यान मुळगाव निजामपूर ता. सांगोला येथील तर शिक्षणासाठी शिरगाव कोकण येथे असलेल्या इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी स्वरा लक्ष्मण कोकरे या चिमुकल्या मुलीच्या शानदार भाषणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. यामध्ये पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी धर्म हाच राजधर्म आणि प्रजेची सेवा हीच माझी पूजा असे मानून त्यांनी प्रजेची सेवा आणि धर्माचे रक्षण जिवापाड केले. म्हणून मनापासून वाटते भारतभर पसरली कीर्ती तुझी तीर्थक्षेत्र बांधल्या धर्मशाळा उद्धार काढून अहिल्या माता रयतेस तिने लावला लळा अशा शब्दात इतिहास मांडला. यावर उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. यावेळी अनिशाताई माने यांनी विचार व्यक्त केले. काल दिवसभर सभामंडपात धनगरी ओव्यांचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी देखील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी धनगर समाज सेवा मंडळ सांगोला यांच्यावतीने विशेष परिश्रम घेतले.

## उमेद बचत गटांसाठी पाच कोटीचा मॉल उभारू: नाम जयकुमार गोरे
## सांगोला महोत्सवात ऐन उन्हातही महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



सांगोला :सांगोला महोत्सव २०२६ अंतर्गत आयोजित महिलांसाठी उद्योग व्यवसाय मार्गदर्शन मेळाव्यास ऐन उन्हाच्या भरातही महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिलांच्या प्रचंड उपस्थितीमुळे कार्यक्रमस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

मा. ना. जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमास कल्याणीताई गाडगीळ, दीपक आबा साळुंखे-पाटील, चेतनसिंह केदार, ाळासाहे एरंडे,भाऊसाहेब रुपनर, शशिकांत चव्हाण, संभाजी आलदर, मारुती आबा बनकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी ॲड.सचिन देशमुख यांनी सांगोला तालुक्यातील उमेदच्या बचत गटांसाठी स्वतंत्र ५ कोटी रुपयांचा भव्य मॉल उभारण्याची मागणी केली. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत मा. ना. जयकुमार गोरे साहेब यांनी उमेद बचत गटांसाठी मॉल उभारून देण्याचे मान्य केले.तसेच संयोजक ॲड. सचिन देशमुख यांनी कोळे येथील बचत भवनाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. त्यावर जयकुमार गोरे यांनी कोळे बचत भवनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे मान्य केले.

महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, बचत गटांसाठी मॉल उभारण्याची घोषणा आणि कोळे बचत भवनासाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या आश्वासनामुळे हा मेळावा विशेष चर्चेचा विषय ठरला.




## सांगोल्याचा पूढील आमदार शहाजीबापू पाटीलच होणार;स्थानिक निवडणुकांच्या बेरजेनुसार शिवसेनेचे पारडे जड : उद्योग मंत्री ना.उदय सामंत




सांगोला : वेळापूर येथे शिवसेना पक्षाच्या बूथ लेव्हल एजंट अभियानाचा आणि प्रमुख पदाधिकारी निवडीचा भव्य मेळावा अत्यंत उत्साहात पार पडला. सध्या राज्यात सुरू असलेल्या एसआयआर मतदान पुनरीक्षण याद्यांच्या पार्श्वभूमीवर या बैठकीत सांगोला विधानसभा मतदारसंघातील ३०५ बूथ आणि माळशिरस मतदारसंघातील सर्व बूथ रचनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या ऐतिहासिक सभेला राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदयजी सामंत, शिवसेनेचे राष्ट्रीय सरचिटणीस राहुलजी शेवाळे, सोलापूर जिल्ह्याच्या खासदार ज्योतीताई वाघमारे, सांगोला तालुक्याचे माजी आमदार शहाजीबापू पाटील आणि माढा लोकसभा संपर्कप्रमुख चंद्रहार पाटील यांची प्रमुख उपस्थित होते. सभेला मार्गदर्शन करताना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगोला तालुक्यातील बूथ रचनेचे विशेष अभिनंदन केले.

ते म्हणाले, तालुक्यात ३०५ BLA ची नेमणूक करणे आवश्यक असताना, सांगोल्यामध्ये तब्बल ६१० लोकांची नियुक्ती करून ऑनलाईन पद्धतीने मतदार याद्यांचे पुनरीक्षण सुरू आहे, हे कौतुकास्पद आहे. तालुक्यातील स्थानिक निवडणुकांमध्ये (नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती) मिळालेल्या मतांच्या बेरजेनुसार सांगोला विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे पारडे अत्यंत जड आहे.

पुढे बोलताना त्यांनी विश्वास व्यक्त केला की, भविष्यातील राजकारणात २०२९ ला सांगोल्याचे आमदार पुन्हा शहाजीबापू पाटीलच होतील. तसेच, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात जो उठाव झाला, त्याचे मुख्य शिलेदार शहाजीबापू पाटील आहेत. त्यांच्यामुळेच गुवाहाटीचे पर्यटन आणि शिवसेनेची प्रसिद्धी देशभरात झाली, अशी जाहीर कबुलीही सामंत यांनी यावेळी दिली. कडक उन्हाळ्यात ४२ अंश तापमान असतानाही शिवसैनिकांनी दाखवलेल्या ताकदीबद्दल आणि पक्षावरील प्रेमाबद्दल त्यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाची सुरुवात शिवसेना तालुकाप्रमुख तथा जिल्हा परिषद सदस्य दादासाहेब लवटे यांनी सर्वांचे स्वागत करून केली. माळशिरस तालुक्याच्या वतीने सभापती पैलवान दत्ता मगर आणि सागर पाटील यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचा व मान्यवरांचा भव्य सत्कार केला.

<u>६ हजार कोटींचा निधी आणूनही पराभवाची खंत...आता गाफील राहणार नाही: शहाजीबापू पाटील</u>

यावेळी माजी आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले की, सांगोला तालुक्यासाठी ६ हजार कोटींपेक्षा जास्त निधी आणला, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना मंजूर करून घेतली, तरीही केवळ मतदार याद्यांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आणि बूथ लेव्हलवर काम कमी पडल्यामुळे गेल्या वेळी पराभव स्वीकारावा लागला. ही खंत व्यक्त करतानाच, आता भविष्यात 'एसआयआर' मतदान पुनरीक्षण याद्यांमध्ये योग्य नावे टिकवणे आणि बोगस नावे वगळणे ही काळाची गरज असून, आगामी काळात गाफील न राहता काम करावे, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

या भव्य मेळाव्यासाठी नगराध्यक्ष आनंदभाऊ माने, गटनेते पप्पू धनवजीर, सर्व समितीचे सभापती व नगरसेवक, उपसभापती अजय सरगर, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब बंडगर, पंचायत समिती सदस्य उमेश पाटील, युवक नेते गुंडादादा खटकाळे, योगेश खटकाळे, धनंजय काळे, उदयसिंहघाडगे, अमित पाटील, चंद्रकांत चौगुले, महेंद्रकुमार बाजारे, विजय मगर, तानाजी भोसले, तसेच प्रसिद्धीप्रमुख दीपक ऐवळे उपस्थित होते.

याशिवाय सांगोला व माळशिरस तालुक्यातील सर्व गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, आजी- माजी पदाधिकारी, बूथ लेव्हलवर काम करणारे सर्व बीएलए, महिला भगिनी, पत्रकार आणि हजारो शिवसैनिक या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कडक उन्हाची तमा न बाळगता कार्यकर्त्यांनी दाखवलेल्या या उत्साहामुळे परिसरात शिवसेनेने मोठे शक्तीप्रदर्शन केल्याचे दिसून आले.

# मुक्त विचार

## विचारधन



हे राज्य मला ईश्वराने सोपवले आहे. प्रजेचे कल्याण आणि रक्षण करणे हे माझे आद्य कर्तव्य आहे आणि मी माझ्या प्रत्येक कृतीसाठी ईश्वराला उत्तरदायी आहे.

-पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर

# प्रजाजनासाठी धडपडणाऱ्या अहिल्यादेवी होळकर लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, महाराजे, सम्राट आणि राज्यकर्ते होऊन गेले. काहींनी युद्धे जिंकून इतिहास घडविला, तर काहींनी आपल्या पराक्रमाने साम्राज्य विस्तारले. परंतु जनतेच्या मनावर राज्य करणारे आणि प्रजेला आपल्या कुटुंबाप्रमाणे जपणारे राज्यकर्ते फार थोडे होऊन गेले. अशा मोजक्या लोककल्याणकारी राज्यकर्त्यांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. सत्ता, संपत्ती आणि वैभवाच्या शिखरावर असूनही ज्यांनी जनतेच्या सुख-दुःखाला आपल्या जीवनाचे ध्येय मानले, अशा अहिल्यादेवी आजही लोकस्मृतीत 'मातोश्री' म्हणून जिवंत आहेत. अहिल्यादेवींचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग, दूरदृष्टी आणि लोककल्याण यांचे अद्वितीय उदाहरण होय. चौंडी या छोट्याशा गावात जन्मलेल्या या कन्येने पुढे माळवा प्रदेशाच्या राज्यकारभाराची धुरा समर्थपणे सांभाळली. पती खंडेराव होळकर यांचे युद्धात निधन झाल्यानंतर तत्कालीन समाजरचनेनुसार त्यांच्यावर सती जाण्याचा दबाव होता. परंतु सासरे मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. हा निर्णय केवळ एका स्त्रीचे जीवन वाचवणारा नव्हता, तर भारतीय इतिहासाला एक आदर्श शासिका देणारा ठरला.

त्यांच्या न्यायप्रियतेच्या अनेक कथा आजही लोकपरंपरेत सांगितल्या जातात. सुभेदार तुकोजीराव होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्यालाही शिक्षा देण्यात आली. सत्ता, नातेसंबंध किंवा पद यापेक्षा न्याय मोठा आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. आजच्या काळात सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या लोकांवर कारवाई करण्यास प्रशासन अनेकदा टाळाटाळ करते. अशा वेळी अहिल्यादेवींची न्यायनिष्ठा अधिकच प्रेरणादायी वाटते. अहिल्यादेवींनी राज्यकारभार केवळ महसूल गोळा करण्यापुरता मर्यादित ठेवला नाही. त्यांनी शेतकरी, व्यापारी, कारागीर आणि सामान्य जनतेच्या विकासाला प्राधान्य दिले. शेतकरी सुखी तर राज्य सुखी हा विचार त्यांनी प्रत्यक्षात उतरविला. शेतकऱ्यांवरील अन्यायकारक कर कमी केले. तलाव, विहिरी आणि पाणीपुरवठ्याच्या सुविधा निर्माण केल्या. दुष्काळाशी मुकाबला करण्यासाठी जलसंधारणाची कामे केली. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी गोपालनाला प्रोत्साहन दिले.

त्यांच्या काळात व्यापार आणि उद्योगधंद्यांनाही उत्तेजन मिळाले. महेश्वर हे शहर त्यांनी केवळ राजधानी म्हणून विकसित केले नाही, तर ते वस्त्रोद्योग, संस्कृती आणि विद्वत्तेचे केंद्र बनवले. आज प्रसिद्ध असलेल्या महेश्वरी साड्यांच्या परंपरेला चालना देण्याचे श्रेयही त्यांनाच जाते. रोजगारनिर्मिती आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आधुनिक आर्थिक धोरणांनाही मार्गदर्शक ठरावेत असे आहेत. अहिल्यादेवींची दूरदृष्टी केवळ अर्थकारणापुरती मर्यादित नव्हती. सामाजिक सुधारणांच्या बाबतीतही त्या आपल्या काळाच्या कितीतरी पुढे होत्या. सतीप्रथेच्या विरोधात त्यांनी लोकजागृती केली. धर्मग्रंथांचा आधार घेऊन सतीप्रथेला कोणताही शास्त्रीय आधार नसल्याचे लोकांना पटवून दिले. विधवांच्या हक्कांचे संरक्षण केले. दत्तक घेण्याच्या प्रक्रियेत अडथळे आणणाऱ्या अधिकाऱ्यांना फटकारले. स्त्रियांच्या सन्मानासाठी आणि स्वावलंबनासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले.

समाजातील वंचित आणि आदिवासी घटकांबद्दलही त्यांची भूमिका संवेदनशील होती. भिल्ल आणि गोंड जमातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. रोजगार, जमीन आणि सैन्यात स्थान देऊन त्यांना सन्मानाचे जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून दिली. गुन्हेगारीकडे वळलेल्या लोकांना शिक्षा देतानाच त्यांचे पुनर्वसन करण्याची मानवी दृष्टी त्यांनी दाखवून दिली. आजच्या काळात शासन आणि प्रशासन यांच्यावर अनेकदा लोकांपासून दूर असल्याचा आरोप होतो. विकासाच्या नावाखाली सामान्य माणसाच्या समस्या दुर्लक्षित होतात. अशा वेळी अहिल्यादेवींचे शासन मॉडेल अधिक महत्त्वाचे ठरते. त्यांनी विकास, न्याय, शिक्षण, सामाजिक समता, धार्मिक सहिष्णुता आणि लोककल्याण यांचा सुंदर समन्वय साधला होता. म्हणूनच त्यांचा तीस वर्षांचा राज्यकाल हा माळव्याच्या इतिहासातील सुवर्णकाळ मानला जातो.

अहिल्यादेवींच्या कार्याची दखल केवळ भारतातच नव्हे तर परदेशी इतिहासकारांनीही घेतली. अनेक इंग्रजी लेखकांनी त्यांची तुलना रशियाच्या कॅथरीन द ग्रेट आणि इंग्लंडच्या राणी एलिझाबेथ यांच्याशी केली आहे. परंतु वस्तुतः अहिल्यादेवींचे व्यक्तिमत्त्व या सर्व तुलनांच्या पलीकडचे आहे. कारण त्यांची महानता केवळ राज्यकारभारात नव्हती, तर जनतेच्या हृदयात निर्माण झालेल्या विश्वासात होती. आजही इंदूर विमानतळ, देवी अहिल्या विश्वविद्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांसारख्या संस्थांमधून त्यांच्या कार्याची आठवण जिवंत ठेवली जाते. मात्र त्यांना खरी आदरांजली म्हणजे त्यांच्या विचारांचे अनुकरण होय. जनतेच्या कल्याणाला प्राधान्य देणारे प्रशासन, न्यायाला सर्वोच्च स्थान, स्त्री-सन्मान, शिक्षणाचा प्रसार आणि सर्वसमावेशक विकास यांची अंमलबजावणी करण्यातच त्यांचे स्मरण सार्थ ठरेल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या केवळ इतिहासातील एक महान शासिका नव्हत्या; त्या लोककल्याणकारी राज्यकारभाराचा जिवंत आदर्श होत्या. सत्तेला सेवेत रूपांतरित करणाऱ्या, न्यायाला धर्म मानणाऱ्या आणि जनतेच्या सुखात स्वतःचे सुख शोधणाऱ्या या मातोश्रींचे जीवन आजच्या राज्यकर्त्यांसाठी दीपस्तंभ आहे. म्हणूनच इतिहासाच्या पानांवर त्यांचे नाव केवळ एका राणीचे नसून, रयतेच्या सुखासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकमातेचे म्हणून सदैव अजरामर राहील. सत्ता ही जनसेवेसाठी असते, वैभवासाठी नव्हे; हे आपल्या कर्तृत्वातून जगाला दाखवून देणाऱ्या लोकमाता अहिल्यादेवींना कोटी कोटी प्रणाम. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**-प्रविण बागडे,नागपूर**

# इतकी घाई कशासाठी?

त्याने सिग्नल मोडला. तो जोशात आणि वेगात पुढे सरकला. तेवढ्यात त्याच्या कानावर पोलिसाची शिट्टी पडली. तो थांबणार नव्हताच; पण पोलिसाने त्याच्याही पुढे आपली गाडी घातली आणि त्याला थांबणे भाग पाडले. तो नाखुशीतच थांबला. तेवढ्या काळात त्याने खिसाही चाचपला. पोलिसाला शंभराची नोट द्यायची तयारी झाली होती त्याची. पोलीस जवळ आला. त्याच्या हातात त्याने कोर्टाच्या आणि दंडाच्या पावतीऐवजी एक पत्र ठेवलं. त्या पत्रातील मजकूर असा होता...

'या पत्राच्या पाठीमागे जो फोटो आहे तो माझ्या मुलीचा आहे. जी काही दिवसांपूर्वी शाळेतून घरी चालली होती. सायकलस्वार असूनही ती वाहतुकीचे सगळेच नियम पाळायची. त्या दिवशीदेखील हिरवा सिग्नल मिळाल्यानंतरच ती पुढे सरकली होती. पण तुझ्यासारख्याच एकाने तिला धडक दिली. ती धडक इतकी जोरदार होती की, एकदम मोठा आवाज झाला. काय झालं हे कळायच्या आत माझी मुलगी हे जग सोडून गेली होती. नंतर कोर्टकचेर्‍या झाल्या. कारवाई झाली. मोठ्या रकमेच्या दंडावर त्याची सुटका झाली. ज्याच्यामुळे माझी मुलगी कायमची दुरावली तो आरामात फिरतोय आणि आमचं घर मात्र आजही तिच्या आठवणीने गहिवरतं आहे.

यात नेमकी चूक कोणाची होती? त्या मुलाकडे याचं उत्तर नव्हतं. पोलिसाकडे वळून काही बोलावं म्हणून वर पाहिलं तर समोर कोणीच नव्हतं. पोलीस कधीच निघून गेला होता.असाच एक प्रसंग खडकाळी सिग्नलवर घडलेला. ते काका इंदिरानगरला राहायचे. शासकीय कर्मचारी होते. एमएटी होती त्यांची. इतके सज्जन आणि पापभिरू होते की पायाखाली मुंगी मेली तरी त्यांचा जीव कळवळायचा. कायदा पाळण्यासाठी असतो. तो सर्वांच्या हितासाठी बनतो. त्यामुळे तो प्रत्येकाने पाळलाच पाहिजे अशा विचारसरणीत त्यांचं अर्ध आयुष्य गेलं होतं.

त्या दिवशी ते खडकाळी सिग्नल पार करत असतानाच रॉंग साईडने बिनधास्त येणार्‍या एका बाईकने धडक दिली. बाईकवाला गंभीर जखमी झाला पण काकांना मात्र आपला जीव गमवावा लागला. त्यांच्या घरी कळलं तेव्हा फारच उशीर झाला होता.

यात नेमकी चूक कोणाची होती?

आपल्याला सर्वांना इतकी कशाची घाई असते? बेधडक सिग्नल मोडण्याइतकी, दणादण रॉंग साईडने गाडी चालवण्याची हिंमत कुठून आली? आपल्या जिवाची नाही तरी इतरांच्या जिवाची काळजी न करण्याइतके बधिर आपण कधीपासून व्हायला लागलो?पराक्रमाची व्याख्या बदलून टाकलेली असावी. वाहतुकीचे कोणतेही नियम न पाळणे, भरधाव वेगाने वाहन हाकणे, रॉंग साईडने गाडी घालणे, पोलिसाला गुंगारा देणे हाच खरा पराक्रम समजू लागलो आहोत की काय?

लक्षात घ्या, सर्वांनीच असे वागायचे ठरवले तर? काय होईल आपल्या शहराचे? सगळीकडे अनागोंदी माजणार नाही का? त्याचा फटका सगळ्यांनाच बसेल? मग काय कराल? कदाचित मग कळेल शिस्तीचं महत्त्वं. पण तोपर्यंत फार उशीर झालेला नसेल का?

शिस्त मोडण्याची सवय एकवेळ समजण्यासारखी आहे. पण जेव्हा एखाद्याच्या जिवाचा प्रश्न असतो तेव्हा तरी नियम नको का पाळायला? कोणत्याही सिग्नलवर जा, कोणत्याही एकेरी वाहतूक असलेल्या रस्त्यावर जा. असे मूर्ख नाम शिरोमणी भेटतातच. आजकाल सिग्नल पाळणार्‍यांना, शिस्तीत गाडी चालवणार्‍यांना जिवाची भीतीच वाटू लागली आहे. आपण सिग्नल पाळला तरी समोरचा काय करेल याची शाश्वती नसते. कोण कुठून गाडी घालेल आणि आपल्यावर येऊन आदळेल याचा भरवसाच राहिलेला नाही.एखाद्या चौकात पोलीस वाहतूक नियंत्रण करण्याचा प्रयत्न करत असतो. त्याने एका दिशेची वाहने हात दाखवून थांबवलेली असतात. तो बिचारा शिट्टी वाजवत असतो. पण त्याच्या नाकाखालून वेगात पुढे निघून जाणारे महाभाग कमी नाहीत. तो हात दाखवतोच आहे आणि त्याची नजर थोडीशी हटताच गाडी पुढे सरकते. बहुतेक जण असंच वागतात. मग कोणत्या तरी एका क्षणी वाहतूक जाम होते. हॉर्न वाजायला लागतात. पेट्रोलचा धूर व्हायला लागतो..मग कोणीतरी पोलिसांवर दुगाण्या झाडतं. त्यांचं कसं लक्ष नाही यावर तावातावाने मत मांडलं जातं.

आपण वाट्टेल तसं वागायचं. पाहिजे तशी गाडी पळवायची. सगळे नियम-कायदे खुंटीवर टांगायचे. पोलिसाला, सिग्नलला कोणालाच जुमानायचे नाही. पण हीच वेळ आपल्यावर आली तर....दुसर्‍याच्या चुकीमुळे आपला जीव पणाला लागला तर...असं आत्तापर्यंत झालं तेव्हा काय घडलं.

स्वत:वर वेळ आली की माणसं टमाटमा बोलायला लागतात. समोरच्या माणसावर कारवाई व्हावी असा आग्रह धरतात. लोक कसे बेशिस्त झाले आहेत. कायदे कसे धाब्यावर बसवले जातात. पोलीस कसे काहीच करत नाहीत...असं लेक्चरही झोडतात.

तो क्षण संपला की पुन्हा प्रत्येकाचे पहिले पाढे पंचावन्न होतात.

बेकायदा वागण्याची सुरूवात कोणीतरी एक जण करतो आणि मग इतरांची भीड चेपत जाते. बेकायदा वागायचं ठरतं तेव्हा प्रत्येकाचं आतलं मन काहीतरी सांगायचा प्रयत्न करत असतं. इशारा देत असतं. प्रत्यकाने आतला आवाज ऐकला तर कदाचित जिवावर बेतणारी ही घाई संपून जाईल. पण इथे आतला आवाज ऐकायला वेळ कोणाला आहे? सगळ्यांच्या पाठी वाघ लागला आहे. सगळ्यांना फक्त दुसर्‍याच्या पुढं जायचं आहे. दुसरा चुकतो आहे हे माहिती असूनही प्रत्येकाला गर्दीचा, बेशिस्तीचा एक भाग व्हायचं आहे.

आपण किती दिवस नुसतं बघत बसणार?

बेकायदा वागणार्‍याला, वाहतूक जाम करणार्‍याला, सिग्नल मोडणार्‍याला, वाहतूक पोलिसाच्या इशार्‍याकडे दुर्लक्ष करणार्‍याला कधीतरी थांबवणार आहोत की नाही? सगळ्यांच्या भल्यासाठी पुढाकार घेणार आहोत की नाही? पांढरपेशा वृत्ती कधीतरी सोडणार आहोत की नाही? मला काय त्याचं....या भूमिकेचा त्याग आपण कधी करणार?आपल्याला हे करावंच लागेल. सर्वांनी शस्त्रं म्यान करून कसं चालेल? परिस्थिती बदलायला हवी असेल तर त्याची सुरुवात स्वत:पासून करावी लागेल.


साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-३१ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# फॅबटेक पॉलिटेक्निक मधील ४८ विद्यार्थ्यांची हरमन इंटरनॅशनल कंपनीत निवड

सांगोला : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षणासोबत रोजगाराच्या उत्कृष्ट संधी उपलब्ध करून देण्यामध्ये अग्रस्थानी असलेल्या सांगोला येथील फॅबटेक कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकने पुन्हा एकदा आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे.

महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील तब्बल ४८ विद्यार्थ्यांची हरमन इंटरनॅशनल या नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य तानाजी बुरूंगले यांनी दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये राजनंदिनी यादव, वेदिका पानसंदे, शाहिस्ता शेख, प्राची पाटील, विद्याराणी आसबे, श्रेयश घाडगे, रोहित रोंगे, प्रतीक क्षीरसागर, रोहन लेंडवे, अमोल कोरे, श्रीराम क्षीरसागर, संकल्प बुधबुडे, तुकाराम होनमाने, कृष्णा ताजव, ओंकार राजगे, संदेश बेहेरे, प्रमोद चौगुले, ओंकार पाटील, रितेश शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, विराज शेलके, अनामिका तळेकर, प्राजक्ता गायकवाड, प्रतीक्षा लवटे, साक्षी मासाळ, साक्षी काळे, स्नेहल अनुस, रोहन इंगोले, पृथ्वीराज गोडसे, पृथ्वीराज नवले, सुशांत लेंढवे, प्रथमेश कांबळे, पायल भूषण, पूजा खांडेकर, सुवर्णा होनमाने, हर्षदा भुसनर, सानिका भोसले, संजना पाटोळे, करुणा जगदाळे, प्रज्ञा जगदाळे, श्रीराम राजश्री, अनुष्का गायकवाड, जान्हवी लोंढे, मयुरी कांबळे, प्रतीक्षा लेंडवे, आकांक्षा कदम, सिमरन मुलाणी व ज्योती पुजारी यांचा समावेश आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य तानाजी बुरूंगले, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभाग प्रमुख प्रा.महेश वाळूजकर यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## सांगोला येथे कृषी दुकान फोडून ३ लाख ४६ हजारांचा ऐवज लंपास

सांगोला : शहरातील सांगोला-वाढेगाव रोडवरील अयोध्यानगरी समोरील कृष्णा कृषी उद्योग या इलेक्ट्रीक मोटार पंप, सबमर्शिबल व कॉपर केबल विक्रीच्या दुकानात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून तब्बल ३ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सांगोला पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत संतोष पाटील (वय ४७, रा.राजापूर, ता.सांगोला) यांनी फिर्याद दिली आहे.

दि. २२ मे २०२६ रोजी रात्री ८ वाजल्यापासून ते दि. २४ मे रोजी सकाळी ८ वाजेपर्यंतच्या कालावधीत ही चोरी झाली. चोरट्यांनी दुकानाच्या पाठीमागील बाजूस असलेला पत्रा कशाच्या तरी साहाय्याने कापून उचकटला व दुकानात प्रवेश करून विविध कंपन्यांचे सबमर्शिबल केबल, सीसीटीव्ही डीव्हीआर व रोख रक्कम असा मोठा ऐवज लंपास केला. चोरीस गेलेल्या मालामध्ये १ लाख ३२ हजार रुपये किमतीचे युनिल कंपनीचे ४ एमएम सबमर्शिबल केबल (१००० मीटर), ६६ हजार रुपये किमतीचे ठखनज कंपनीचे ४ एमएम केबल (५०० मीटर), २४ हजार ६०० रुपये किमतीचे ठखनज कंपनीचे ४ एमएम केबल (१८७ मीटर), ४६ हजार रुपये किमतीचे ठखनज कंपनीचे २.५ एमएम केबल (५०० मीटर), २१ हजार ३०० रुपये किमतीचे पॉलीकॉपर कंपनीचे २.५ एमएम केबल (१९४ मीटर), २० हजार ४०० रुपये किमतीचे जयकिसान कंपनीचे ४ एमएम केबल (१५५ मीटर), ७ हजार रुपयांचा सीसीटीव्ही डीव्हीआर तसेच ५ हजार रुपयांची रोख रक्कम यांचा समावेश असून पुढील तपास पोहेकाँ. २१८१ भोसले करीत आहेत.

## पुजारवाडीत घरफोडी; दीड तोळ्याचे मंगळसूत्र लंपास

सांगोला : सांगोला शहरातील पुजारवाडी येथे अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून सुमारे १ लाख २० हजार रुपये किंमतीचे दीड तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सांगोला पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सौ.भिमाबाई मिटकरी (वय ४०, रा.पुजारवाडी, सांगोला) यांनी तक्रार दिली आहे. दि.१० एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजल्यापासून ते दि. ४ मे २०२६ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घरात चोरीच्या उद्देशाने प्रवेश करून संमतीशिवाय कपाटातील सुमारे १ लाख २० हजार रुपये किमतीचे दीड तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र लबाडीने चोरून नेले. या प्रकरणी दि.२९ मे २०२६ रोजी सांगोला पोलिस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकॉ. वाघमोडे करीत आहेत.

## पु. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आज विविध कार्यक्रमांचे आयोजन

सांगोला : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त धनगर समाज सेवा मंडळ सांगोला तालुका यांच्यावतीने आज रविवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आज रविवार दि. ३१ रोजी सकाळी ९ वाजता पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण कार्यक्रम संपन्न होणार आहे. त्यानंतर सकाळी ९ : ३० वाजता सांगोला शहरातून भव्य रॅली काढण्यात येणार आहे. सदर रॅलीचे उद्घाटन तहसीलदार बाळूताई भागवत, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. दुपारी १२ वाजता धनगरी ओव्यांचा भव्यदिव्य कार्यक्रम संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आनंदा व्हटे, अरुण कोळेकर, तानाजी सरगर, दगडू लेंगरे, राजू कोळेकर, सिद्धेश्वर शिंगाडे, पिंटू गावडे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. सायंकाळी ४ वाजता पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेची शहरातून शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभा यात्रेचे आकर्षण म्हणून घोडे, उंट, रथ, डीजे, साऊंड, हलगी ग्रुप, कैफियत, धुळदेव गजी ढोल, न्यू नॅशनल बँड, जय हनुमान बँजो, शोभेचे दारूकाम असणार आहे. सदर शोभायात्रेचे उदघाटन नगराध्यक्ष आनंदभाऊ माने व धनगर समाज सेवा मंडळ सांगोलाचे अध्यक्ष म्हाळाप्पा शिंगाडे व सर्व संचालक व सल्लागार यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

तरी या सर्व कार्यक्रमासाठी सांगोला शहर व तालुक्यातील नागरिकांनी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन धनगर समाज सेवा मंडळ सांगोला अध्यक्ष म्हाळाप्पा शिंगाडे, उपाध्यक्ष सचिन गावडे, खजिनदार संदीप कोळेकर, सचिव परमेश्वर जानकर यांच्यासह सर्व संचालक व सल्लागार समिती यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## ग्रामीण युवकांनी नोकरी मागणारे नव्हे तर उद्योग घडवणारे बनावे- भाऊसाहेब रूपनर
## सांगोला महोत्सवातून रोजगाराची नवी दिशा; ३०० जणांना नोकरीची संधी



सांगोला : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त सांगोल्यात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या सांगोला महोत्सवात रोजगार आणि उद्योग क्षेत्राला नवे बळ देणारा भव्य नोकरी महोत्सव उत्साहात पार पडला.

ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला. फॅबटेक उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात तब्बल ४० हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी झाल्या. विविध क्षेत्रातील कंपन्यांनी युवक-युवतींच्या थेट मुलाखती घेतल्या. यामध्ये राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या ७०० पेक्षा अधिक युवक-युवतींनी सहभाग नोंदवत रोजगारासाठी मुलाखती दिल्या, तर प्राथमिक निवड प्रक्रियेतून ३०० हून अधिक उमेदवारांना नोकरीची संधी उपलब्ध झाली असुन ग्रामीण भागातील युवकांनी नोकरी मागणारे नव्हे तर उद्योग घडवणारे बनावे असे प्रतिपादन फॅबटेक उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांनी नोकरी महोत्सव उद्घाटन प्रसंगी बोलताना व्यक्त केले.

नोकरी महोत्सवाचे उद्घाटन भाऊसाहेब रूपनर यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी प्रा. विठ्ठल शिंदे, अँड. सचिन देशमुख, उद्योजक बाळासाहेब एरंडे, डॉ. संजय आदाटे, प्रा. दिनेश रूपनर, प्रा. धनंजय शिवपुजे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वर्गीय आमदार भाई डॉ. गणपतराव देशमुख यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित कंपन्यांच्या प्रतिनिधींचे विठ्ठल मूर्ती व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना भाऊसाहेब रूपनर म्हणाले,ग्रामीण भागातील युवकांमध्ये गुणवत्ता आणि क्षमता अफाट आहे. मात्र योग्य संधी आणि व्यासपीठ मिळत नाही. सांगोला महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना त्यांच्या गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. भविष्यात अशा उपक्रमांचा अधिक व्यापक विस्तार करण्यात येईल. नोकरी भरती मेळाव्यात उत्पादन, ऑटोमोबाईल, आयटी, इलेक्ट्रिकल, फार्मा, बँकिंग, सर्व्हिस सेक्टर आदी क्षेत्रातील कंपन्यांनी सहभाग घेतला होता. उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्य आणि अनुभवाच्या आधारे प्राथमिक निवड करण्यात आली. अनेक युवकांना ऑन-द-स्पॉट ऑफर लेटर देण्यात आल्याने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

हा नोकरी महोत्सव यशस्वी करण्यासाठी फॅबटेक टेक्निकल कॅम्पस, फॅबटेक मल्टिस्टेट बँक, फॅबटेक फाउंडेशन तसेच विविध संस्थांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सांगोल्यात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर रोजगार मेळावा झाल्याने संपूर्ण तालुक्यात या उपक्रमाची चर्चा रंगली आहे.

**निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी**
**नियमित वाचा....**
साप्ताहिक
**माणदेश वार्ता**

